27 NOV 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर






मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ मध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यातील शहीद वीरांना शिवाजी विद्यापीठात रविवारी रात्री कँडल मार्च काढून श्रद्धांजली वाहण्यात आली. विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभाग व मास कम्युनिकेशन विभागातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

27 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कँडल मार्चने शहिदांना अभिवादन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

मुंबईतील २६/११ च्या अतिरेकी हल्ल्यात वीरमरण 'आलेल्या शहिदांना जिल्ह्यासह शहरातील विविध संघटना, संस्था व पोलिस दलाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. कँडल मार्च, रक्तदान अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने वृत्तपत्र संवाद शास्त्र आणि मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठात कँडल मार्च काढून मुंबई हल्ल्यात अतिरेक्यांशी मुकाबला करून हौतात्म्य पत्करलेल्या जवानांना अभिवादन करण्यात आले. लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्याच्या वतीने पंचगंगा नदी परिसरात अभिवादन केले. लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्याचे निरीक्षक तानाजी सावंत, आरटीओ निरीक्षक पी. डी. सावंत यांनी मुंबई पोलिस दलातील अधिकारी हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळस्कर, तुकाराम ओंबाळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी निरीक्षक सावंत यांनी मुंबई हल्ल्यातील शहबीद पोलिस अधिकाऱ्यांच्या आठवणी सांगून त्यांच्या स्मृतीस उजाळा दिला. यावेळी नगरसेवक प्रताप जाधव, अनिल पाटील, किशोर घाटगे, पूजा सावंत, श्रद्धा माजगावकर, युवराज जाधव यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

पोलिस क्रीडा संकुलातील शहीद अशोक कामटे मैदानावर खेळाडूंनी कामटे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला, तर पोलिस कर्मचाऱ्यांनी सीपीआर हॉस्पिटलमध्ये रक्तदान केले. शहरातील जुना राजवाडा, करवीर, शाहूपुरी, राजारामपुरी पोलिस ठाण्यात शहीद पोलिस अधिकाऱ्यांना अभिवादन करण्यात आले.

अर्जुन टाकळकर




**शिवाजी विद्यापीठात वृत्तपत्र संवादशास्त्र विभाग व मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी कँडल मार्च काढून मुंबई हल्ल्यातील शहिदांना अभिवादन केले.**

27 NOV 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात एक कँडल शहिदांसाठी

## मास कम्युनिकेशन, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग यांच्या वतीने आदरांजली



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन, वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कँडल मार्चने मुख्य इमारतीसमोर २६/११ च्या हल्ल्यात शहीद झालेल्यांना आदरांजली वाहण्यात आली. (छायाः रियाज ट्रेनर)

प्रतिनिधी
कोल्हापूर


मुंबईत २६ नोव्हेंबर २०११ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात पोलीस अधिकारी, कर्मचारी, जवान व नागरिक शहीद झाले. या शहीदांना आदरांजली वाहण्यासाठी कँडल मार्च काढण्यात आला. मुलींच्या वसतीगृहापासून कँडल मार्च रॅलीला सुरुवात करण्यात आली. इमारतीसमोर हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर यांच्यासह सर्व शहीदांच्या प्रतिमेसमोर सुरक्षारक्षक विठ्ठल कुलकर्णी यांच्या हस्ते कँडल लावून अभिवादन करण्यात आले.

हा कार्यक्रम मास कम्युनिकेशन, वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. मुख्य इमारतीसमोर 'मी भारत देशाचा नागरिक म्हणून माझे आरोग्य समृध्द ठेवीन. भ्रष्टाचार, व्यभिचारापासून दूर राहीन' अशी सामुहिक शपथ घेण्यात आली. विठ्ठल कुलकर्णी यांनी २६/११च्या हल्ल्यात शहीद झालेल्या अशोक कामटे, विजय साळसकर, हेमंत करकरे, तुकाराम ओंबाळे यांच्याबद्दल उपस्थितांना माहिती दिली. मास कम्युनिकेशन, आणि वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी २६/११ च्या भ्याड हल्ल्याचा निषेध केला. यावेळी उपकुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. शिवाजी जाधव, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर, अनिल देशमुख, डॉ. प्रवीण कोडोलीकर, सुरक्षा रक्षक शिवाजी पाटील, किरण पोवार, व्ही. एस. डावरे, डी. जे. मोहिते, पन्हाळा तहसीलदार कार्यालयातील अव्वल लिपीक वैशाली शिरसाट मुलींच्या वसतिगृहातील नाईट वॉर्डन यांच्यासह विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2017
तरुण भारत

# विद्यापीठात आता 'संविधान दूत' योजना

प्रतिनिधी
कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे संविधान दिनानिमित्त 'संविधान दूत' या अभिनव योजनेला प्रारंभ केला आहे, अशी माहिती केंद्र संचालक डॉ. एस.एस. महाजन यांनी जाहीर केली.

डॉ. महाजन म्हणाले, भारतीय संविधानाबद्दल जनजागृती करण्यासाठी 'संविधान दूत' सुरू करण्यात येणार आहे. मानवी हक्क व मूल्यांप्रती जागृती निर्माण करणे हा प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. केंद्रातर्फे राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्राचे महाविद्यालयीन प्रतिनिधी संविधानदूत म्हणून कार्यरत राहतील. महाविद्यालयाचे प्राचार्य किमान एका शिक्षकाची 'संविधान दूत' म्हणून निवड करून, विद्यापीठातील डॉ. आंबेडकर केंद्राला त्यांचे नाव पाठवतील. डॉ. आंबेडकर केंद्र आणि संलग्नित महाविद्यालये एकत्रितपणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग आदींचा समावेश असेल. यासाठी संविधान दूत समन्वयक म्हणून काम पाहतील. त्याचप्रमाणे संयुक्त संशोधनकार्यही हाती घेण्यात येईल. त्यात महाविद्यालयीन शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह इतरांनाही सामावून घेतले जाईल.

## संविधान दिनानिमित्त आज परिसंवाद

डॉ. आंबेडकर केंद्रातर्फे संविधान दिनानिमित्त सोमवारी (२७) रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात 'भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर" या विषयावर परिसंवाद आयोजित केला आहे. परिसंवादात डॉ. रविवंद होवाळ (सोलापूर), प्रा. सुभाष दगडे (सांगली) आणि राजेंद्र कुंभार (सातारा) हे सहभागी होतील. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स



# विद्यापीठात आज परिसंवादाचे आयोजन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने भारतीय संविधान दिनानिमित्त 'भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर परिसंवाद होणार आहे.

सोमवारी (ता.२७) सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहामध्ये हा कार्यक्रम होईल. परिसंवादामध्ये डॉ. रविनंद होवाळ, प्रा. सुभाष दगडे आणि राजेंद्र कुंभार विचार मांडणार आहेत. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी. शिर्के उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थी, शिक्षक व समाजातील जिज्ञासूंनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन या केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

## संविधानदूत मोहीम

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे येत्या संविधान दिनानिमित्त 'संविधान दूत' ही अभिनव योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. एस.एस. महाजन यांनी दिली. डॉ. महाजन म्हणाले, विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक सक्षम व प्रगल्भ व्हावेत, त्यांच्या माध्यमातून समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि धर्मनिरपेक्षता आदी उदात्त मानवी मूल्यांची रुजवात व्हावी तसेच भारतीय संविधानाबद्दल जागृती करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ कार्यक्षेत्रात विशेष योजना राबविण्याचे डॉ. आंबेडकर केंद्राने ठरविले होते.